District Level Volleyball Tournament

# बालमोहन, प्रताप, शानबाग, बुऱ्हाणी स्कूलला विजेतेपद

## शालेय व्हॉलिबॉल स्पर्धा



**जळगाव** : जिल्हास्तरीय आंतरशालेय व्हॉलिबॉल स्पर्धेत बालमोहन विद्यालय, प्रताप विद्यामंदिर, शानबाग विद्यालय, बुऱ्हाणी इंग्लिश मीडियम स्कूल या संघांनी आपापल्या गटात विजेतेपद पटकावले.

जिल्हास्तरीय आंतर शालेय १७ व १९ वर्षे वयोगटातील मुले आणि मुलींच्या स्पर्धा नूतन मराठा महाविद्यालयात संपन्न झाली.

१७ वयोगटात अंतिम सामन्यात मुलांच्या गटात शानबाग विद्यालय जळगाव हा संघ विजेता ठरला तर इंदिराबाई ललवाणी, जामनेर संघाने उपविजेतेपद संपादन केले. मुलींच्या गटात बुऱ्हाणी इंग्लिश मीडियम स्कूल पाचोरा संघाने अजिंक्यपद तर तर पी. आर. हायस्कूल धरणगाव संघाने उपविजेतेपद संपादन केले.

१९ वर्षांखालील गटात मुलांच्या स्पर्धेत बालमोहन उच्च माध्यमिक विद्यालय चोपडा संघ अजिंक्य ठरला. मु. मा. कनिष्ठ महाविद्यालय पाचोरा संघ उपविजेता ठरला. मुलींच्या गटात प्रताप विद्या मंदिर चोपडा संघाने विजेतेपद पटकावले. इंदिरा गांधी विद्यालय धरणगाव संघ उपविजेता ठरला.

सर्व विजयी व उपविजयी संघांना पासिंग व्हॉलिबॉल असोसिएशनतर्फे विभागीय पातळीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या. या स्पर्धेचे उद्घाटन नूतन मराठा महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एल. पी. देशमुख, आंतरराष्ट्रीय महिला खेळाडू मंजुषा भिडे यांच्या हस्ते करण्यात आले होते. यावेळी पासिंग व्हॉलिबॉल असोसिएशनचे अध्यक्ष फारुख शेख, सचिव शिवछत्रपती प्राप्त पुरस्कार प्राप्त अंजली पाटील, संघटनेचे इफ्तेखार शेख, भाऊसाहेब पाटील, क्रीडा अधिकारी सुजाता गुल्हाणे, मार्गदर्शक राजेंद्र चौहान आदींची उपस्थिती होती.

या स्पर्धेत पंच म्हणून राष्ट्रीय पंच मंजुषा भिडे, राज्य पंच इफ्तेखार शेख, दर्शन आटोळे, धनंजय आटोळे, भावेश शिंदे, हर्षल भोसले, कृपा बाविस्कर व यश जंजाळे आदींनी काम पाहिले.

महाराष्ट्र स्पोर्ट्स 24 sep 23